# जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्क, जिल्हा रुग्णालय, भंडारा.

### वैद्यकिय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदभरती करीता अर्ज मागविण्याबाबत....

मा.जिल्हाधिकारी भंडारा यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या आरोग्य सेवा भंडारा या जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केन्द्र, ग्रामीण रुग्णालय, सामान्य रुग्णालयातील महाराष्ट्र आरोग्य सेवा (गट-अ) यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणुन **<u>कंत्राटी पध्दतीने रिक्त ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची आहेत</u>.**

१) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा पदावर नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत राहील.

२) सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यांत येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

३) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यासारखे म.ना.से.निवृत्तीवेतन म.ना.से.(रजा)नियम लागू राहणार नाहीत तसेच ते विमा योजना,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

४) कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडुन दिली जाणार नाही.

५) केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यांत येणार नाही.

७) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिण्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

८) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत १००/- चे स्टॅम्पपेपर करारनामा करण्यांत येईल.

९) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमीक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियीमत वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. (**M.B.B.S.**) अर्हताधारकांमधुन प्राधान्याने भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे **B.A.M.S** अर्हताधारकामधुन त्या ठिकाणी नियीमत अथवा कंत्राटी **एम.बी.बी.एस.** (**M.B.B.S.**)अर्हताधारक वैद्यकिय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात येईल.

१०) शासकिय अनुभव प्राप्त उमेदवारांना व शासकिय कोव्हीड सेंटर मध्ये कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

११) रिक्त पदांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता असल्याने **B.A.M.S** अर्हताधारक उमेदवारांची गुणानुक्रमे नियमानुसार अंतिम यादी तयार करण्यात येईल त्यावेळेस रिक्त पदानुसार नियुक्ती देण्यात येईल व उर्वरीत उमेदवारांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल.

सदरहु तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची **कंत्राटी पदे भरण्यासाठीदिनांक** 31/3/2021 **पर्यत अर्ज मागविण्यांत येत आहे.**

करीता उमेदवारांनी दिनांक ———————— चे ५.०० वाजेपर्यत अर्जासह एमबीबीएस व विशेषज्ञ पदासाठी पदव्युत्तर पदवी/पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका,पदविका/पदवी प्रमाणपत्र, वैद्यकिय परिषदेचे नोदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्राची छायांकित प्रत जिल्हा रुग्णालय, भंडारा येथील प्रशासकिय अधिकारी / आस्थापना विभाग कार्यालयास सादर करावे. व मुलाखती वेळी मुळ प्रमाणपत्र सोबत घेवुन येणे आवश्यक आहे.

उमेदवाराचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढुन टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| अर्ज सादर करण्याचा शेवट चा दिनांक | | जिल्हा रुग्णालय, कार्यालय भंडारा |
| मुलाखतीचा दिनांक | | जिल्हाधिकारी कार्यालय,भंडारा |

पदाचे नांव :- वैद्यकिय अधिकारी वर्ग-२, गट - अ व बट-ब (कंत्राटी)

| अ.क्र. | जिल्हा रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रे | मानधन |
|---|---|---|
| १ | आदिवसी व दुर्गम भागात काम करणारे विशेषज्ञ वैद्यकिय अधिकारी | ९००००/- |
| २ | विशेषज्ञ वैद्यकिय अधिकारी (इतर भागात काम करणारे) | ८५०००/- |
| ३ | आदीवासी व दुर्गम भागात काम करणारे एमबीबीएस वैद्यकिय अधिकारी | ८००००/- |
| ४ | इतर भागात काम करणारे एमबीबीएस - वैद्यकिय अधिकारी | ७५०००/- |
| ५ | आदिवासी व दुर्गम भाग बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी | ४५०००/- |
| ६ | इतर भागात काम करणारे बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी | ४००००/- |

स्वाक्षरी
जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, भंडारा.
तथा
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती

स्वाक्षरी
जिल्हाधिकारी, भंडारा
तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती